**TEST-3** Code : KICK

**प्रश्नपुस्तिका** Sr. No. 1234

**सामान्य क्षमता चाचणी** **एकुण प्रश्न** : 80

**वेळ :** 2 (दोन) तास **(पेपर - II)** **एकुण गुण** : 200

---

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 80 प्रश्न अनिवार्य आहेत. उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परिक्षाक्रमांक ह्या चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सुचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1,2,3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सुचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमुद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायाकिंत करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नाची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने सोडविणे श्रेयस्कर आहे पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालवता नंतर त्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एखादे नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) प्रस्तुत परिक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील तसेच उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील.

KARVY'S INSTITUTE FOR COMPETITIVE KNOWLEDGE
Plot No. 20, 'Vatsala' Vanrai Nagar, Manewada, Nagpur-34
..Just for your goals

**स्पर्धेच्या युगामध्ये स्पर्धकास योध्दाच व्हावे लागते. योध्दा तोच जो आहे त्या परिस्थितीमध्ये झुंज देतो केवळ आपल्या ध्येयपुर्तीसाठी !**

**आपणही नक्कीच योध्दा असाल यात काही शंका नाही ....**

**मग घ्या शस्त्रे हातात ज्ञानार्जणाची, मेहनतीची, चिकाटीची, प्रामाणीकतेची आणि जिंका हे युध्द स्पर्धेचे !**

*All the Best...*

KARVY'S INSTITUTE

**परिच्छेद १**

केवळ कायदे बनवून दुष्ट रूढी बंद होत नाहीत. वास्तविक परिवर्तनाकरता लोकांना जागृत करण्याची गरज आहे; त्याकरता लहानपणापासून हे मूल्य रूजवले पाहिजे. कारण त्यामुळे देशातील लोकसंख्येचा निम्मा घटक विकासाच्या कार्यात सहभागी होऊ शकत नाही. नेहमी प्राचीन काळी स्त्रियांना कसे समान अधिकार होते त्याची उदाहरणे दिली जातात. राजघराण्यातील स्त्रियांना युध्दाचे शिक्षण दिले जात असे. त्या उत्तम राज्यकारभार चालवू शकत होत्या. वेदकाळांतील मैत्रेयी, गार्गी या विदुषी होत्या. परंतु परकीय आक्रमणामुळे व सामाजिक बंधनामुळे स्त्रियांचा दर्जा खालावत गेला. पण ब्रिटिश राजवटीमुळे आणि नंतर स्वातंत्र्य मिळाल्यावर स्त्रीशिक्षण व स्त्रीजीवन विकासाचा विचार व प्रसार करणारे समाजसुधारक स्त्रीपुरूष यांच्या प्रयत्नांमुळे स्त्रीशिक्षणाला गती मिळाली. स्त्री विषयक कायदे व विविध शिक्षण आयोग यांच्या सक्रिय पाठिंब्यामुळे स्त्रीपुरूष समानतेच्या विचाराला चालना मिळाली.

आपल्या देशाच्या पंतप्रधान स्त्री होत्या. आजही समाजात वेगवेगळया क्षेत्रांत उच्चपदावर स्त्रिया आहेत. पण त्या अशा किती आहेत ? १९९३ मध्ये महाराष्ट्रात राज्य महिला आयोगाची निर्मिती झाली. स्त्रियांना ३० टक्के जागा सर्व क्षेत्रांत राखीव करण्यात आल्या पण दुर्देवाची परिस्थिती अशी आहे की त्या जागेकरता आवश्यक शिक्षण आणि घराच्या बंधनातून मुक्तता त्यांना मिळाली नाही आवश्यक तेवढी पात्रता त्या मिळवू शकल्या नाहीत. हे कार्य फक्त कायदे करून होत नाही. त्याच्या जोडीला लोकशिक्षणाची गरज असते. स्त्रिया आपले अधिकार वापरीत नाहीत. अशा वेळी त्यांना अधिकाराची जाणीव करून देणे आवश्यक ठरते.

स्त्रीपुरूष समानता म्हणजे त्यांच्यामधे स्पर्धा नव्हे. मुलींनी मुलांसारखे कपडे घालून वावरणे म्हणजे समानता नाही. तर स्त्रियांना शिक्षणाची समान संधी, त्यांच्याशी सन्मानपूर्वक वागणूक, त्यांच्यावर अन्याय किंवा त्याची अप्रतिष्ठा होणार नाही असे वर्णन म्हणजे समानता होय ! स्त्रीमुक्ती चळवळीच्या घोषणा देण्याचे समानता मिळत नाही. निसर्गाने स्त्रीला जे खास गुण दिले आहे त्यांची जोपासना तिने करायला हवी. निसर्गाने सोपविलेले बालसंगोपनाचे अतिशय महत्वाचे आणि जबाबदारीचे काम तिने विसरता कामा नये. आजपर्यंत पुरूषांनी स्त्रियांना दुय्यम लेखले म्हणून आता स्त्रियांनी त्यांना दुय्यम लेखणे, त्यांचा अपमान करणे आणि कुटुंबातील स्वास्थ विघडविणे योग्य नाही. समानतेचे ध्येय प्राप्त करण्यासाठी पुरूषांशी झगडण्यापेक्षा सहकार्याने वागायला हवे.

**1. कायदयाचे महत्व काय असू शकते ?**

(1) वाईट रूढी बंद करणे (2) कोणत्याही कार्यास सैधानिक मान्यता देणे

(3) समाजबदल घडवून आणणे (4) गुन्हेगाराला शिक्षा देणे

KARVY'S INSTITUTE

**2. समाजपरिवर्तन कसे शक्य आहे?**

(1) सामाजिकीकरणाची मानवी जीवनातील प्रत्येक टप्प्यावरील प्रक्रीया समाजपरिवर्तनाकरीता पार पाडणे

(2) कायदयाची अंमलबजावणी शिस्तबध्द पध्दतीने करणे

(3) नवीन समाजाची रचना करणे.

(4) समाजपरिवर्तन शक्य नाही.

---

**3. लेखक 'समानता' हा शब्द कोणत्या अर्थाने वापरतो ?**

(1) प्रत्येकास त्याचे सर्व अधिकार बहाल करणे.

(2) अधिकार व जबाबदाया यांची सुयोग्य सांगड घालणे.

(3) प्रत्येकास समान संध्या उपलब्ध करून देणे.

(4) प्रत्येकास कायदयाने स्वरक्षण देणे

---

**4. स्त्रीया आपले अधिकार केव्हा वापरावयास लागतील ?**

(1) कायदयान्वये अधिकारांचे स्वंरक्षण झाल्यास

(2) स्त्रीपुरूष समानता निर्माण केल्यास

(3) स्त्रीयांना मायाच्या जागांवर अधिकार दिल्यास

(4) स्त्रीयांना अधिकारांची जाणीव करून दिल्यास

---

**5. परिच्छेदातून लेखक काय समजवण्याचा प्रयत्न करीत आहे ?**

(1) स्त्रीपूरूष समानता ही केवळ परस्पर सन्मान आणि सहकार्यातूनच शक्य आहे.

(2) प्राचीन समाज हा तत्कालीन समाजापेक्षा सामाजिकदृष्ट्या प्रगत होता.

(3) स्त्री समानता कायदयाच्या अमंलबजावणीतून शक्य आहे.

(4) स्त्रीने समानतेच्या नावाखाली पुरूषांवर अत्याचार करू नये.

---

**परिच्छेद २**

'माता भूमी: पुत्रोऽहं पृथिव्या:' म्हणजचे ही भूमी माझी माता आणि मी पृथ्वीचा पुत्र असे भूमीशी आपुलकीचे नाते जोडणारी आपली संस्कृती आहे. भारतीय संस्कृती फार प्राचीन आहे. या देशाच्या संस्कृतिने सायांना सामावून घेतले आहे. हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिश्चन सर्वजण सर्वांचे सण साजरे करतात. नृत्य, नाटय, साहित्य, कला यांना भारतीय संस्कृतीमध्ये महत्व आहे. 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसी' या वचनाप्रमाणे जन्मभूमीला श्रेष्ठ

KARVY'S INSTITUTE

माननारी आपली संस्कृती आणि परंपरा आहे. अशा जन्मभूमीच्या संरक्षणाकरता आणि उन्नतीकरिता सतत झटणारी इथली प्रजा आहे.

राष्ट्रीय प्रतीके म्हणजे मुख्यत: आपला राष्ट्रध्वज आणि आपले राष्ट्रगति. जगातील प्रत्येक राष्ट्राला स्वत:चा ध्वज असतो हा त्या राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या मनात एकत्वाची व देशभक्तीची भावना निर्माण करतो. आपल्या देशाची ध्वजा फडकत राहण्यासाठी राष्ट्रातील अनेक लोक आपल्या प्राणाचे बलिदान करायलाही कचरले नाहीत असा आपला इतिहास सांगतो. राष्ट्रगीत एका सुरात म्हणत असताना आपल्या मनात एकतेची भावना निर्माण होते. राष्ट्रध्वज फडकविणे, राष्ट्रगीत म्हणणे या गोष्टी एकत्र केल्या जातात. रवींद्रनाथ टागोरांनी रचलेले 'जनगणमन' हे आपले राष्ट्रगीत आहे. या गीतातून राष्ट्रीय एकतेचा, आणि सहिष्णुतेचा संदेश मिळतो.

'सारे जहॉ से अच्छा' हे सर महंमद इकाबल यांचे गीत ! फाळणीपूर्वी हे त्यांनी रचले. प्रथम भारतीय अवकाशयात्री राकेश शर्मा अवकाशात असताना, त्याला तिथे काय वाटतंय ? हे विचारले असता त्याला आपल्या राष्ट्राचेच प्रथम स्मरण झाले व त्याने सारे जहॉसे अच्छा या गीताच्या पंक्ती म्हणून आपली राष्ट्रभक्ती व राष्ट्राभिमान व्यक्त केला.

आपला देश स्वतंत्र झाला पण त्यानंतर आपलेच लोक स्वकीयांची पिळवणूक करीत आहेत. देशातील विकृत व विध्वसंक शक्तीची जनतेला सतत भीती वाटते. निश्चित जीवन राहिले नाही. स्वार्थ, लाचलुचपत यांचे प्रमाण वाढले आहे. राष्ट्रीय नासधूस करण्याचे प्रमाण बळावले आहे. या परिस्थितीची नोंद घेऊन या दुष्ट प्रवृत्तीबद्दल व वाईट गुणांबद्दल चीड निर्माण होऊन त्यांचे पारिपत्य करण्याकरता या दुष्ट प्रवृत्तीचे सुष्ट प्रवृत्तीमध्ये रूपांतर झाले पाहिजे. त्याकरता विद्यार्थ्यांना तसे शिक्षण देऊन आणि मार्गदर्शन करून त्यांच्या वर्तनातून ते कसे प्रकट होईल ह्याकरता प्रयत्न करणे जरूर आहे. राष्ट्राबद्दल प्रेम, भक्ती या भावना आल्या की राष्ट्राविषयीचा आदर वाढेल. निष्ठा आणि समर्पणाची भावना वाढेल त्याकरता राष्ट्रगीत भावपूर्ण म्हणणे, राष्ट्रगीताच्या वेळी शिस्तीत उभे राहणे, प्रतिज्ञा म्हणताना तिचा भावार्थ समजून ती म्हणणे, राष्ट्रध्वजाचा आदर राखणे त्यांचा आदरपूर्वक उल्लेख करणे, स्वातं य लढ्यातील व्यक्तींची माहिती मिळविणे, देशभक्तीपर गीते गोळा करून ती सांघिकरीत्या म्हणणे, पथनाट्याच्या माध्यमातून काही ऐतिहासिक घटना सादर करणे, स्वदेशीचा स्वीकार करण, प्राचीन वास्तूंना भेट देणे, त्यांचे जतन करणे, राष्ट्रविघातक कृत्यांना विरोध करणे, राष्ट्रीय मालमत्तेचे रक्षण करणे, राष्ट्रीय व नैसर्गिक संकटाच्या वेळी देशबांधवांना मदत करणे. राष्ट्रविघातक कृत्यांना विरोध करणे, राष्ट्रीय नैसर्गिक संपत्तीची माहिती करून घेणे व तिचा यथोचित उपयोग करणे अशा किती तरी गोष्टी प्रत्येकाच्या मनात रूजल्या पाहिजेत.

KARVY'S INSTITUTE

**6. स्वातन्त्र्यानंतर भारतात अनेक अनिष्ट प्रवृत्ती फोफावत आहेत. ह्याबाबत लेखकाचे काय मत आहे ?**

(1) या प्रवृत्तीच्या लोकांचा समूळ नायनाट झाला पाहीजे

(2) अशा प्रवृत्ती बदलून चांगल्या प्रवृत्ती झाल्या पाहीजेत

(3) अशा प्रवृत्ती निर्माण होण्यापासून परावृत्त केले पाहीजे

(4) अशा प्रवृत्तीचा विरोध केला पाहीजे.

---

**7. लेखकाने राष्ट्रभावना वाढीस लागण्याकरीता कोणते कार्ये सुचविली आहेत ?**

(1) देशप्रेमावर सिनेमा प्रदर्शित करणे (2) इतिहासावर ग्रंथ लिहिणे

(3) प्राचीन वस्तुंचे संग्रहनालय तयार करणे (4) स्वदेशीचा स्विकार करणे

---

**8. वरील परिच्छेदातून लेखकास वाचकांस काय संदेश दयायचा आहे ?**

(1) देशप्रेम हे कृतीशील असले पाहिजे

(2) देशप्रेमाकरीता राष्ट्रविरोधी शक्तीचा नायनाट केला पाहिजे

(3) विद्यार्थ्यांना देशप्रेमाचे शिक्षण दिले पाहीजे

(4) वाईट गुणांची प्रत्येकाच्या मनात घृणा निर्माण होणे आवश्यक आहे

---

**परिच्छेद ३**

प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शाळांमधून व अध्यापिका विद्यालयांमधून पहिली तासिका मूल्यशिक्षणाची असावी, अशी शासकीय परिपत्रकाद्वारे सूचना करण्यात आली आहे. त्या मूल्यशिक्षणाच्या उपक्रमालाच शालेय परिपाठ म्हणतात. शालेय स्तरावर विद्यार्थी□शिक्षक व मुख्याध्यापक यांनी रोज सातत्याने सामूहिकरीत्या या तासिकेत मूल्याशिक्षणाच्या उद्दिष्टानुसार योजनाबद्ध रीतीने करावयाचे उपक्रम म्हणजे शालेय परिपाठ ! शिक्षकांनी मूल्यसंवर्धनाकरता आपापल्या वर्गासाठी वेगवेगळे उपक्रम करायचे असतातच पण शालेय परिपाठ हा संपूर्ण शाळेचा असा विशेष उपक्रम असतो. या निमित्ताने शिस्तबद्ध नियोजित केलेला कार्यक्रम शाळेतील सर्वजणांनी एकत्र येऊन करावा□त्यांच्यात सहकार्याची रूजवण व्हावी आणि शाळेत चांगले वातावरण तयार व्हावे ही यामागची भूमिका आहे.

'Values canot be taught, they can only be caught' असे मूल्यांच्या बाबतीत म्हटले जात असताना एखाद्या तासिकेमध्ये या मूल्यांचे शिक्षण कसे काय द्यायचे, हा फार मोठा प्रश्न आहे. तसेच सर्वच शिक्षकांना हे शिक्षण कसे काय द्यायचे, हा फार मोठा प्रश्न आहे. तसेच सर्वच शिक्षकांना हे शिक्षण देणे जमेल का हाही एक प्रश्न आहे. परंतु मूल्यशिक्षणाच्या अभावामुळे समाजामध्ये दैनंदिन अभ्यासक्रमातून दिल्या जाणाया

KARVY'S INSTITUTE

मूल्यशिक्षणाबरोबर एखादी स्वतंत्र तासिका देऊन त्यामध्ये पोषक वातावरण निर्माण करून त्यांतील मूल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात करू देण्याची संधी प्राप्त करून द्यायलाच हवी असे तज्ज्ञांना वाटले म्हणूनच हा उपक्रम सुरू केला आहे.

या तासिकेमध्ये विविध प्रकारचे कार्यक्रम, जसे प्रार्थना, प्रतिज्ञा, समूहगीत, ओंकार, सुविचारकथन, पथनाटय, विशेष वातम्या असे सादर केले जातात. त्यातले काही ना काही तरी प्रत्येक शिक्षक निश्चितच करू शकेल. ज्याला गाण्याचे अंग आहे तो समूहगीत बसवेल. ज्याला ते जमणार नाही तो मूल्यविचारावर बोलेल किंवा सुविचार कथन करील किंवा प्रसंगाला योग्य अशी गोष्ट सांगेल केवळ विरोधाकरता विरोध न करता आणि नकारात्मक वृत्तीऐवजी सकारात्मक वृत्ती ठेवून त्याकरता मनाची तयारी आणि प्रयत्न करायला हवेत, काही तासिकांचे निरीक्षण करायला हवे. वेगवेगळया शिक्षकांनी विशिष्ट मूल्यांवर बोलायचे असे ठरविले तर आधीपासून तशी तयारी करता येते व थोडया वेळात आशयसंपन्न विचार व्यक्त करता येतात. मूल्यशिक्षणाकरता आणखी काही उपाय सापडले तर त्यांचाही अवलंब करायला हरकत नाही परंतु त्यामध्ये शिक्षणांचा सहभाग प्रमुख असावा.

**9. शाळांमधून मुल्यशिक्षणाचे पारासणाचा कोणता फायदा होऊ शकतो ?**

(1) विद्यार्थ्यांमध्ये मुल्यशिक्षणाची जाणीव होते

(2) शिक्षणांना विद्यार्थ्यांना इतर परंपरागत शिक्षण शिकविणे सोपे जाते

(3) विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य आणि सामाजिक भावना निर्माण होण्यास मदत होते.

(4) विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात खेळीमेळीचे वातावरण निर्माण होते.

---

**10. 'शालेय परीपाठ' बाबत खालीलपैकी कोणते विधान अचुक आहे ?**

(a) मुल्यशिक्षण परंपरा (b) शाळेचा विशेष कार्यक्रम

(c) एक शिस्तबध्द नियोजन (d) शालेय नियंत्रण प्रणाली

(1) केवळ b (2) a,b,c (3) केवळ b व c (4) a,c,d

---

**11. खालील विधानांना लक्षात घ्या.**

(a) शिक्षकांनी मूल्यसंवर्धनाकरता आपपल्या वर्गासाठी वेगवेगळे उपक्रम करावयाचे असतातच

(b) सर्वच शिक्षकांना हे शिक्षण देणे जमेल का हाही एक प्रश्न आहे

(c) ज्याला गाण्याचे अंग आहे तो समूहगीत बसवेल.

**वरील कोणती वाक्ये हे स्वतंत्ररित्या अर्थपूर्ण आहेत ?**

(1) केवळ a (2) केवळ a व c (3) केवळ b व c (4) वरील सर्व

---

KARVY'S INSTITUTE

**12. लेखक मुल्यशिक्षणाचे खालीलपैकी कोणते फायदे सुचवितो ?**

(a) सहकार्याची भावना रूजविता येते

(b) विद्यार्थ्यांना शिस्तीचे वातावरण मिळते

(c) शिक्षकांना विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधता येतो

(d) सामाजिक समस्यांना आळा घालण्यास मदत होते.

(1) केवळ a (2) a,b,c (3) केवळ a व d (4) केवळ b

---

**परिच्छेद ४**

मनातल्या सगळया इच्छांचा जेव्हा त्याग करतो व स्वत:च्या ठिकाणी स्वत:च संतुष्ट राहतो. त्या माणसाला स्थितप्रज्ञ म्हणतात.

दु:खाच्या प्रसंगी मन खिन्न न होणाया आणि सुखाच्या प्रसंगी कुठली इच्छा न बाळगणाया तसेच वासना, भय व क्रोध यांना थारा न देणाया स्थिर बुद्धीच्या माणसाला 'मुनी' म्हणतात.

वेळोवेळी शुभ किंवा अशुभ प्राप्त झाले असता नेहमी त्यामध्ये गुंतून न राहता जो शुभाचे अभिनंदन करीत नाही किंवा अशुभाचा द्वेष करीत नाही त्याची बुद्धी स्थिर आहे असे मानले पाहिजे.

कासव ज्याप्रमाणे आपले अवयव आत ओढून घेतो त्याप्रमाणे इंद्रियांच्या विषयापासून जो आपली इंद्रिये ओढून घेतो त्याची बुद्धी स्थिर मानली पाहिजे.

विषयांचे सेवन न करणाया माणसापासून विषय दूर जातात. रसांच्या पलीकडे असलेल्या परब्रह्याचे ज्ञान झाल्यावर त्याची रसज्ञता उरत नाही.

विद्वान माणसाने खूप प्रयत्न केला तरी हे अर्जुना, शक्तिशाली इंद्रिये बळाने मन ढवळून टाकतात.

त्या सर्व इंद्रियांचा संयम करून माझेच सतत ध्यान करीत राहा. इंद्रिये ज्याची ताब्यात आहेत त्याची बुद्धी स्थिर मानतात.

विषयांचे चिंतन केल्यामुळे त्यांच्याबद्दल आसक्ती उत्पन्न होते. आसक्तीमुळे त्यांच्याविषयी इच्छा उत्पन्न होते आणि त्यापासून क्रोध उद्‌भवतो.

क्रोधामुळे काही सुचेनासे होते. त्यामुळे स्मरण नाहीसे होते. स्मरण नसले की बुद्धी काम करीत नाही आणि बुद्धी काम करीत नसली की माणसाचा नाश होतो.

विकार व द्वेष यांच्यापासून मुक्त अशा इंद्रियांच्या द्वारे विषयांचे सेवन केल्यास विषय आपल्या आधीन राहतात व माणसाची बुद्धी समतोल राहते.

बुद्धीचा समतोल असल्याने माणसाची सर्व दु:खे दूर होतात. ज्याचे मन प्रसन्न आहे, त्याची बुद्धी स्थिर राहते.

KARVY'S INSTITUTE

**13. बुध्दी स्थिर असणे म्हणजे काय ?**

(1) आनंदी रहाणे (2) सुखपिपासू न होणे.

(3) चांगलेवाईट यांच्यात भेदभाव न करणे (4) परब्रम्हाचे ज्ञान प्राप्त होणे

---

**14. क्रोध निर्माण होण्यासाठीचे जबाबदार घटक कोणते ?**

(a) सातत्याने विस्मरण होणे (b) इच्छेची उत्पत्ती होणे (c) दु:ख निर्माण होणे

(1) केवळ a (2) केवळ a व c (3) केवळ b (4) वरील सर्व

---

**15. वरील परिच्छेदातून काय सुचित होते ?**

(1) परब्रम्हाचे ज्ञान झाल्यावर मनुष्य निरस होतो.

(2) मानवीय संतुष्टी करीता मुक्त इंद्रियांची आवश्यकता आहे.

(3) विव्दतेने इंद्रियांवर नियंत्रण मिळविणे शक्य होते.

(4) दु:खी माणसाला मूनीत्व प्राप्त होऊ शकत नाही.

---

**परिच्छेद ५**

रशियन गणिती अलेक्झांडर फ्रीडमनने १९२२ मध्ये आइन्स्टाईनची समीकरणे स्थिरांक घेऊन व स्थिरांक न घेता सोडविली. स्थिरांक घेऊन सोडविलेल्या समीकरणातून फ्रीडमनला आइन्स्टाईनसारखेच स्थिर स्थितीचे विश्व मिळाले. आणि स्थिरांक न घेता सोडविलेल्या समीकरणातून त्याला जे विश्वाचे रूप मिळाले त्याचे तीन प्रकार पडतात. हे तीनही प्रकार त्याने गृहीत धरलेल्या दोन मूलभूत गोष्टींशी सुसंगत आहेत. 'विश्व सर्व दिशांना सारखे दिसते' आणि 'कोणत्याही ठिकाणापासून ते सारखेच दिसते' अशी ही फ्रीडमनची दोन मूलभूत गृहिते आहेत. फ्रीडमन विश्वाच्या पहिल्या प्रकारात तारकाविश्वे योग्य पण हळू गतीने एकमेकांपासून दूर जातात की ज्यामुळे त्यांच्यामधील गुरूत्वाकर्षण बल काही काळाने त्यांना एकमेकांपासून दूर जाण्यापासून थांबविते. पुन्हा ती तारकाविश्वे एकमेकाकडे यायला लागतात. या प्रकारात विश्व एका कमाल मर्यादेपर्यंत प्रसरण पावते आणि नंतर त्याचे आकुंचन होते. दुसया प्रकारात तारकाविश्वे एवढया प्रचंड वेगाने एकमेकांपासून दूर जातात की, त्यांच्यामधील गुरूत्वाकर्षण बल त्यांना एकमेकांपासून दूर जाण्याचे थांबवू शकत नाही. त्यामुळे विश्व सतत फुगतच राहाते. फ्रीडमन विश्वाच्या तिसया प्रकारात तारकाविश्वे आवश्यक तेवढया प्रमाणित वेगाने एकमेकांपासून दूर जातात. त्यामुळे पुढे या विश्वाचे आकुंचन होत नाही. ते सतत प्रसरण पावते. फ्रीडमनच्या या तीन रूपांपैकी कोणते रूप सध्याच्या विश्वाशी सुसंगत आहे, हे सध्याचा विश्व प्रसरण पावण्याचा वेग आणि त्यातील वस्तुमानाची सरासरी घनता यांची तुलना करून आपण ठरवू शकतो.

KARVY'S INSTITUTE

फ्रीडमनच्या तीनही विश्वांच्या प्रतिरूपांचे एक प्रमुख वैशिष्टय असे की, त्यांची सुरूवात एका अतिलहान आकारमानातून होते. म्हणजेच भूतकाळात विश्वातील सर्व वस्तुमान अतिसूक्ष्म अशां आकारमानात होते. या सूक्ष्म आकारमानालाच विश्वाची ' महास्फोट सिंग्युलेंरिटी ' म्हणतात. ज्यावेळी स्थलकालाचे अस्तित्व संपुष्टात येते आणि घनता अनंत होते अशा विश्वाच्या अवस्थेला सिंग्युलॅरिटी म्हणतात. परंतु त्यावेळी कोणीही विश्वाच्या या अवस्थेचा गांभीर्याने विचार केला नाही. कारण त्यावेळी बयाच लोकांना असे वाटत होते की, आपण राहात असलेले विश्व अशा टोकाच्या अवस्थेला जाऊ शकणार नाही.

विश्व प्रारंभी लहान आकारमानात (सिंम्युलॅरिटीत) होते. मग स्फोट होऊन ते पसरले गेले. अशाच प्रकारची घटना आपणाला विश्वात पाहायला मिळते का ? असा विचार शास्त्रज्ञांमध्ये सुरू झाला. त्यातून स्वत:च्या केंद्राकडे ढासळणाया तायाची घटना पुढे आली. स्वत:च्या पोटातील अणुइंधन संपत आल्यानंतर गुरूत्वाकर्षणामुळे तारा स्वत:च्या केंद्राकडे ढासळू लागतो आणि त्यातूनच 'कृष्णविवर' जन्माला येते. अशा कृष्णविवराच्या केंद्राकडे सिंग्युलॅरिटीची अवस्था असू शकते हे उघड झाले.

रॉजर पेनरोज आणि स्टीफन हॉकिंग यानी एक नवीन गणित पद्धती शोधून काढली. त्या पद्धतीने त्यानी असे दाखवून दिले की, आइन्स्टाईनचा व्यापक सापेक्षतेचा सिद्धांत बिनचूक असेल तर सिंग्युलॅरिटीज अस्तित्वात असल्याच पाहिजेत. यावरून हॉकिंग व पेनरोजनी विश्वाचा जन्म सिंग्युलॅरिटीतून झाला असा निष्कर्ष काढला आहे. १९६६ साली हॉकिंगनी आपल्या पीएच.डी. च्या प्रबंधातील शेवटच्या महत्वाच्या प्रकरणात स्पष्टपणे नमूद केले आहे, 'भूतकाळात विश्व हे सिंग्युलॅरिटीत होते.' फ्रीडमनने आपले गणित आईन्स्टाईनच्या व्यापक सापेक्षतेला वापरून विश्वाची प्रतिरूपे मांडल्यानंतर विश्वोत्पत्तीशास्त्रातील पेनरोज व हॉकिंगचे संशोधन अत्यंत महत्वाचे पाऊल मानले जाते.

**16. खालीलपैकी कोणते विश्वाचे रूप रशियन गणिती अलेक्झांडर फ्रिडमनने सांगितले नाही ?**

(1) विश्वाचे प्रसरण व आंकुचन होत असते. (2) विश्व निरंतरपणे प्रसरण पावत आहे.

(3) विश्व सातत्याने फुगत आहे. (4) विश्वाचे आंकुचन होत आहे.

---

**17. 'कृष्णविवर' ची खालीलपैकी कोणती वैशिष्टये परिच्छेदावरून आकलित करता येतील ?**

(a) लहान आकारमान (b) अधिक जास्त घनता

(c) वाढीव प्रसरण शक्ती (d) स्वकेंद्री आकर्षण

(1) केवळ b (2) केवळ a व d (3) a,b,c (4) a,b,d

---

KARVY'S INSTITUTE

**18. खालील विधाने लक्षात घ्या.**

(a) आइन्स्टाईनने व्यापक सापेक्षतेचा सिंध्दात मांडून विश्वाची स्थिती स्पष्ट केली.

(b) हॉकिंग याने विश्वाचा जन्म जेव्हा स्थलकाळ अस्तित्व नष्ट होते आणि अत्यंत लहान आकारमानास अनंत घनता प्राप्त होते त्यापासून होतो असे प्रतिपादीत केले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही विधाने अचुक आहेत

(2) दोन्ही विधाने चुक आहेत

(3) विधान a अचुक आहे परंतु विधान b चुक आहे.

(4) विधान a चुक आहे परंतु विधान b अचुक आहे.

---

**19. वरील परिच्छेदावरून कोणता निष्कर्ष शक्य आहे ?**

(1) आईन्स्टाईनचा सापेक्षता सिध्दांत भविष्यात खोटा ठरू शकतो.

(2) विश्वाची उत्पत्ती आणि अंत याची चक्रीय साखळी आहे.

(3) विश्व अनंत आणि निरंतर आहे.

(4) स्टीफन हॉकिंग यांनी आईन्स्टाईनच्या तत्वाला तडा दिला आहे.

---

**परिच्छेद ६**

एफ.ए.ॲलन, मार्विन वुल्फगॅंग अशा शास्त्रज्ञांनी परिस्थितीवर भर दिला आहे. आर्थिक विषमता हे गुन्हेगारीचे मोठे कारण आहे असे ते मानतात. कॉलॅजेनी हे तर म्हणतात " गुन्हेगारी ही फायदेशीर आहे. प्रामाणिक माणूस गुन्हेगारापेक्षा कमी पैसा मिळवतो आणि तोच मारला जाण्याची किंवा जखमी होण्याची शक्यता अधिक असते." गुन्हेगार सापडला नाही, तर प्रामाणिक माणसापेक्षा तोच निश्चितपणे जास्त पैसे कमवतो. 'सापडला तर चोर अन्यथा राजाहून थोर' अशी मराठीत एक म्हणच आहे. पण सराईत गुन्हेगार कितीही हुशार, चपळ असला तरी तो न सापडणे हे दुरापास्त असते. कारण समाज आपल्या हजारो डोळयांनी त्याला शोधत असतो आणि शासन त्याला आपल्या शेकडो हातांनी पकडून न्यायालयापुढे उभे करीत असते. ओसामा बिन लादेन सारख्या पाताळयंत्री दहशतवाद्यापर्यंत पोहोचता आले हे वास्तव आपल्यासमोर आहेच.

गुन्हेगारीस आर्थिक कारण कितपत जबाबदार आहे याचा अभ्यास करणायांनी तुरंगातील काही कैद्यांच्या सांपत्तिक परिस्थितीचे निरीक्षण केल्यावर असे आढळून आले की, शंभरातील केवळ सत्तावीस कैदीच अगदी दारिद्रयाने पिडलेल्या कुटुंबातील होते. दारिद्रय हेच गुन्हेगारीचे प्रमुख कारण मानले असते तर सत्तावीस पिडलेले आणि ज्याहत्तर बया किंवा उत्तम आर्थिक परिस्थितीतील होते हे दिसून आले नसते. खरे तर याच्या उलट व्हायला

KARVY'S INSTITUTE

हवे होते. वास्तविक कोणत्याही देशात किंवा समाजात सर्वार्थाने संपन्न असलेले लोक मूठभरच असतात. काही थोडे बया परिस्थितीतील आणि इतर म्हणजे समाजातील बहुसंख्य लोक हातावर पोट भरणारे किंवा दरिद्री असतात. पण तुरूंगात मात्र अशी स्थिती दिसून आली नाही. म्हणजे नुसत्या आकडेवारीचा विचार केला तरी दारिद्रयाला गुन्हेगारीच्या कारणात अग्रस्थान देता येत नाही.

दुसरे असे की, दरिद्री माणसाने गुन्हा केला तर तो पचविण्यास लागणारी साधनसंपत्ती त्याच्याकडे नसते. त्याचा पोशाख, त्याची चालचलणूक पोलिसांना किंवा समाजातील इतर व्यक्तींना संशय न यावा इतक्या दर्जाची नसते. संशय येऊन त्याला पकडेपर्यंत मुद्देमाल लपविण्याच्या किंवा दूर नेण्याच्या जागा त्याला उपलब्ध नसतात किंवा त्या संशयातील नसतात. पोलिसांच्या हाती सापडल्यावर त्यांना लाच देण्याची त्यांची ऐपतही नसते. समाजातील प्रतिष्ठित किंवा राजकारणातील प्रख्यात व्यक्तिच्या नावाचा परवलीच्या शब्दाप्रमाणे स्वत:चा सामाजिक दर्जामुळे त्याला उपयोग करता येत नाही. कारण तशा माणसांशी त्याचा कधीही संबंध आलेला नसतो. आपल्या सभ्यशिष्टाचारयुक्त वागण्याने किंवा सफाईदार इंग्रजी बोलण्याने तो आपली छाप पाडू शकत नसतो. कायद्याच्या कार्यातून सुटका करून घेण्यासाठी नामांकित वकीलही तो आर्थिक कारणामुळे देऊ शकत नसतो. या आणि अशाच कारणांमुळे दरिद्री माणसाने गुन्हा केला की तो विनासायास पकडला जातो आणि कैदेतही जातो. पण चांगल्या आर्थिक स्थितीतील माणसाने गुन्हा केला की त्याला अनेक मार्गांनी शिक्षा चुकवता येते. म्हणजे कैदेतील गुन्हेगारांच्या पाहणीवरून चांगल्या आर्थिक परिस्थितीतील गुन्हेगार जेवढे आढळतात, त्यापेक्षा वास्तवात त्यांचे प्रमाण आर्थिक आढळते. याचाच अर्थ असा की, केवळ दारिद्रयामुळे गुन्हा करायला प्रवृत्त झालेल्यांचे प्रमाण या निरीक्षणावरून कमीच असलेले आढळते.

**20. खालील विधाने लक्षात घ्या.**

(a) गुन्हेगारीचे निश्चित कारणे नसून ती बहुआयामी आहेत.

(b) तुरूंगवास होणाया अपराधी लोकांची आकडेवारी गरीबीला गुन्हेगारी एक महत्वाचे कारण आहे हे दर्शविते.

**पर्यायी उत्तर :**

(1) दोन्ही विधाने अचुक आहेत

(2) दोन्ही विधाने चुक आहेत

(3) विधान a अचुक आहे परंतु विधान b चुक आहे.

(4) विधान a चुक आहे परंतु विधान b अचुक आहे

KARVY'S INSTITUTE

**21. 'सापडला तर चोर अन्यथा राजाहून थोर' याचा अर्थ काय ?**

(1) जो पोलिंसाच्या जाळयात येतो तो नेहमीच चोर असतो

(2) चोर हा राजाहून स्वत:ला श्रेष्ठ समजतो.

(3) गुन्हेगाराचा गुन्हा सिध्द झाला तरच तो चोर ठरतो

(4) चोर नेहमीच सापडतो आणि राजा नेहमीच महान असतो.

---

**22. खालीलपैकी कोणती बाब गरीब गुन्हेगार व्यक्तीकडे नसते ?**

(a) पैसा (b) प्रतिष्ठा (c) सभ्यता (d) इच्छा

(1) केवळ a व b (2) केवळ b व c (3) a,b,c (4) a,b,d

---

**23. परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलपैकी अचुक विधान कोणते ?**

(1) गुन्हेगारी आणि आर्थिक परिस्थिती गुणेत्तरात असते.

(2) आर्थिक परिस्थिती गुन्हेगारीस प्रवृत्त करते.

(3) गुन्हेगाराच्या गुन्हेगारी सिध्दतेच्या मागे त्याची परिस्थिती असते.

(4) प्रामाणिक व्यक्तीपेक्षा गुन्हेगार अत्यंत सुखी असतो.

---

दिलेल्या तक्यात 6 विद्यार्थ्यांनी विविध विषयांत मिळविलेल्या गुणांची टक्केवारी दिलेली आहे. त्याचा अभ्यास करून प्रश्न क्र. 24 आणि 25 ची उत्तरे द्या.

| विद्यार्थी | भौतिकशास्त्र (एकुण गुण 75) | रसायनशास्त्र (एकुण गुण 75) | गणित (एकुण गुण 200) | हिन्दी (एकुण गुण 50) | इंग्रजी (एकुण गुण 150) |
|---|---|---|---|---|---|
| A | 84% | 42% | 67% | 50% | 74% |
| B | 68% | 64% | 49% | 74% | 52% |
| C | 72% | 54% | 58% | 68% | 64% |
| D | 48% | 82% | 63% | 48% | 70% |
| E | 70% | 78% | 71% | 56% | 78% |
| F | 56% | 66% | 55% | 76% | 66% |

**24. विद्यार्थी C ला भौतिकशास्त्रात मिळालेले गुण हे विद्यार्थी A ला हिन्दी विषयात मिळालेल्या गुणाच्या किती टक्के आहेत**

(1) 205% (2) 215% (3) 216% (4) 175%

---

KARVY'S INSTITUTE

**25. विद्यार्थी D ला रसायनशास्त्र आणि इंग्रजी विषयात मिळालेले एकुण गुण आणि विद्यार्थी F ला त्यांच दोन विषयात मिळालेल्या एकुण गुणाची तफावत किती ?**

(1) 17 (2) 18 (3) 19 (4) 20

---

**26. 93 कि.मी.प्रती तास वेगाने चालत असलेली पहिली ट्रेन विरूध्द दिशेहुन 51 कि.मी. प्रति तासाने येत असलेल्या आणि स्वत:पेक्षा लांबीने अर्ध्या असलेल्या दुसया ट्रेनला 24 सेंकदात पुर्णपणे पार करते. त्या नंतर तिच ट्रेन (पहिली) एका पुलाला 66 सेकंदांत पार करत असल्यास पुलाची लांबी किती ?**

(1) 1065 Mtr. (2) 1060 Mtr. (3) 1055 Mtr. (4) 1050 Mtr.

---

**27. खाली 3 विधाने आणि 4 अनुमाने दिलेली आहेत. जरी ती सर्वसाधारणपणे ज्ञात तथ्यांच्या संदर्भात भिन्न वाटत असली तरी त्यांना सत्य मानुन कोणती अनुमाने तर्कसंगत आहेत याचा निर्णय घ्या.**

**विधाने :** सर्व पुस्तके ग्रंथ आहेत□

एकही ग्रंथ नोटबूक नाही,

सगळे नोटबूक पेन्सिल आहेत.

**अनुमान :** (i) एकही पुस्तक नोटबूक नाही.

(ii) एकही पेन्सिल पुस्तक नाही.

(iii) काही पेन्सिल नोटबूक आहेत.

(iv) काही ग्रंथ पुस्तके आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त I, III आणि IV तर्कसंगत आहेत.

(2) फक्त III आणि IV तर्कसंगत आहेत.

(3) सगळे अनुमान तर्कसंगत आहेत.

(4) कुठलाही अनुमान तर्कसंगत नाही.

---

**28. एका व्यवसायात A आणि B यांनी प्रत्येकी 50 आणि 45 रूपयांची गुंतवणूक केली. 4 महिन्यानंतर A ने त्याचे अर्धे भांडवल काढुन घेतले. आणि 6 महिन्यानंतर B ने त्याचे अर्धे भांडवल काढून घेतले. त्या वेळी C ने व्यवसायात भागीदार म्हणुन प्रवेश केला आणि 70 रूपये गुंतविले. तर वर्षा शेवटी तिघांनाही मिळालेल्या नफ्याचे गुणोत्तर काय असेल ?**

(1) 82:83:84 (2) 80:81:84 (3) 82:81:85 (4) 81:83:87

---

KARVY'S INSTITUTE

**29. खालीलपैकी कोणत्या पर्यायातील संख्या उतरत्या क्रमाने आहेत ?**

(1) $6\sqrt{5}$ , $4\sqrt{6}$ , $3\sqrt{2}$ (2) $4\sqrt{6}$ , $6\sqrt{5}$ , $3\sqrt{2}$
(3) $4\sqrt{6}$ , $3\sqrt{2}$ , $6\sqrt{5}$ (4) $6\sqrt{5}$ , $3\sqrt{2}$ , $4\sqrt{6}$

---


**30. प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या ओळखा.**

| | | |
|---|---|---|
| 68 | 38 | 72 |
| 100 | 87 | 137 |
| ? | 30 | 54 |

(1) 44 (2) 24. (3) 48 (4) 42

---

**31.**




**5 च्या विरूध्द पृष्टावर कोणता अंक आहे ?**

(1) 4 (2) 2 (3) 1 (4) 6

---

**32. एक अंक व्यवस्थापन यंत्र संख्यांच्या इनपुटला प्रत्येक चरणात विशिष्ट नियमानुसार पुनव्यवस्थापीत करते. खाली इनपुट आणि पुनव्यवस्थापनाचे चरण यांचे एक उदा. दिलेले आहे.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **इनपुट** | 37 | 29 | 17 | 51 | 46 | 22 | 71 | 33 |
| **चरण I** | 71 | 29 | 17 | 51 | 46 | 22 | 37 | 33 |
| **चरण II** | 71 | 51 | 17 | 29 | 46 | 22 | 37 | 33 |
| **चरण III** | 71 | 51 | 46 | 29 | 17 | 22 | 37 | 33 |
| **चरण IV** | 71 | 51 | 46 | 37 | 17 | 22 | 29 | 33 |
| **चरण V** | 71 | 51 | 46 | 37 | 33 | 22 | 29 | 17 |
| **चरण VI** | 71 | 51 | 46 | 37 | 33 | 29 | 22 | 17 |

चरण VI या इनपुटचा अंतिम चरण आहे. अश्या यंत्रामध्ये 28 63 65 58 57 42 40 हे इनपुट टाकल्यास 65 63 58 57 42 28 40 हा त्या इनपुटचा कुठला चरण असेल ?

(1) III (2) IV (3) V (4) VI

---

**33. 12 पुरूष आणि 16 मुलांना एक काम पुर्ण करायला 5 दिवस लागतात. तेच काम 4 दिवसांत पुर्ण करायचे असल्यास 13 पुरूष आणि 24 मुलांची मदत घ्यावी लागते. तर 7 पुरूष आणि 10 मुलांना ते काम पुर्ण करायला किती दिवस लागतील ?**

(1) 2 1/3 दिवस (3) 5 1/2 दिवस (3) 4 5/2 दिवस (4) 8 1/3 दिवस

---

KARVY'S INSTITUTE

**34.** $P \geq L = Q > E = D \leq W$ या संबंधाच्या आधारावर खालीलपैकी कुठले विधान निश्चितपणे सहसंबंध ध्वनित करतात ?

(1) $W \geq Q$ (2) $L \geq D$ (3) $L \geq E$ (4) $D < P$

---

**35.** A ने पॉईंट Q वरून चालायला सुरूवात केली. दक्षिणेकडे 10 Mtr. जाऊन तो पॉईंट P वर पोहोचला. तिथुन उजवीकडे 18 Mtr. चालत जाऊन तो पॉईंट R वर पोहोचला. पुन्हा डाविकडे वळण घेऊन 8 Mtr. चालत जाऊन पॉईंट T वर पोहोचला. ही जागा (पॉईंट T) पॉईंट S च्या पश्चिमेकडे 18 Mtr. अंतरावर असल्यास पॉईंट R हा पॉईंट S च्या कुठल्या दिशेला असेल ?

(1) इशान्य (2) आग्नेय (3) नैऋत्य (4) वायव्य

---

**36.** एका कुटुंबात 5 सदस्य A, B, C, D आणी E वेगवेगळया क्षेत्रात काम करत आहेत. डॉक्टर एक महिला आहे. E वकील आहे आणि तो C चा भाऊ असुन C हा कुटुंबातील एकुलता एक विवाहीत पुरूष आहे. A पोलिस निरिक्षक असुन दोन मुलांचे वडिल आहेत. सुन डॉक्टर असलेल्या पोलिस निरिक्षकांची B ही मुलगी असुन ती व्यवस्थापक असल्यास E चे B शी नाते काय ?

(1) वडील (2) भाऊ (3) सासरे (4) मुलगी

---

**37.** एका सांकेतिक भाषेत IGH शब्द MFD असा लिहिल्यास CAT शब्द त्याच सांकेतिक भाषेत कसा लिहीला जाईल ?

(1) TZA (2) YZX (3) YZB (4) XZY

---

**38.** सद्यास्थितीत 15625 व्यक्ती राहात असलेल्या एका शहराची लोकसंख्या जर दरवर्षी 4% नी वाढत असेल तर 3 वर्षानंतर त्या शहराची लोकसंख्या किती असेल ?

(1) 16276 (2) 15625 (3) 17576 (4) 18525

---


**39.** A, B, C, D, E, F आणि G एका सरळ रांगेत उत्तरेकडे तोंड करून बसलेले आहेत. F आणि A यापैकी कुणीही रांगेत टोकावर बसलेले नसून त्यांच्या मध्ये फक्त 3 व्यक्ती बसलेले आहेत. फक्त 2 व्यक्ती A आणि G च्या मध्ये बसलेले आहेत. E हा A किंवा F चा लगतचा शेजारी नाही. तसेच E हा B च्या डावीकडे तिसया क्रमांकावर बसलेला आहे. B हा A चा लगतचा शेजारी नाही. E हा C चा लगतचा शेजारी नाही. तर खालीलपैकी कुठल्या दोन व्यक्ती रांगेत टोकावर बसलेल्या आहेत ?

(1) D E (2) B C (3) B G (4) E G

---

KARVY'S INSTITUTE

**40.**




(1) 10 (2) 31 (3) 41 (4) 29


---





**41.** राहुल आणि अजय यांच्या वयाची सरासरी 51 वर्षे आहे. अजय आणि विजय यांच्या वयाची सरासरी 36 वर्षे तसेच राहुल आणि विजय यांच्या वयाची सरासरी 43 वर्षे आहे. तर 12 वर्षांनंतर अजय आणि विजय यांच्या वयाचे गुणोत्तर काय असेल ?

(1) 5:7 (2) 7:5 (3) 6:7 (4) 7:6

---

**42.** आकृत्यांची मालीका दिलेली आहे आकृतिचा क्रम पुढे सुरू राहण्यासाठी योग्य पर्याय निवडा.



(1)  (2)  (3)  (4) 

---

**43.** अभयला एका परिक्षेत प्रति पेपर सरासरी 74 गुण मिळाले त्याला जर भुगोल आणि इतिहासाच्या पेपरमध्ये अनुक्रमे 12 आणि 10 गुण ज्यास्त मिळाले असते तर तिच सरासरी प्रति पेपर 76 इतकी झाली असती. तर त्या परिक्षेत एकुण किती पेपर होते ?

(1) 11 (2) 9 (3) 5 (4) 7

---

नऊ मित्र A ते I एका गोलाकार टेबलाभोवती टेबलाकडे तोंड करून बसलेले आहेत. H हा E च्या उजविकडे चौथ्या स्थानावर बसलेला आहे. B हा D च्या डाविकडे तिसया स्थानावर बसलेला आहे. I हा C च्या उजवीकडे तिसया स्थानावर असून A आणि B चा लगतचा शेजारी आहे. F हा B आणि G पासून सारख्याच अंतरावर बसलेला आहे. D आणि E च्या मध्ये दोन व्यक्ती बसलेल्या आहेत.

या माहितीच्या आधारावर प्रश्न क्र.44 आणि 45 सोडवा.

**44. F च्या डावीकडे तिसया स्थानावर कोण बसलेला आहे ?**

(1) B (2) H (3) C (4) I

---

**45. विसंगत जोडी ओळखा.**

(1) HB (2) DH (3) IA (4) CG

---

**46. इंग्रजी वर्णमालेतील काही वर्ण खाली एका विशिष्ट संख्येशी नाते दर्शवितात.**


| R | T | E | N | P | O | I |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |

या नात्यांचा वापर करून पर्यायामधून असे संख्यासंयोजन (Combination of Numbers) निवडा जेणेकरून अर्थपूर्ण शब्द तयार होईल.

(1) 5312764 (2) 5674231 (3) 5162374 (4) 2 आणि 3 दोन्ही

---

विरूध्द पृष्टभागावरील अंकांच्या संख्याची बेरीज 7 असलेल्या 6 वेगवेगळया सोंगटयांच्या आकृतिचा विचार करा आणि प्र.क्र.47 आणि 48 सोडवा.




**47. सर्व विषम स्थानावरील सोंगटयांच्या वरच्या पृष्टावर विषम संख्या असल्यास त्या सगळया विषम संख्यांची बेरीज किती येईल?**

(1) 7 (2) 9 (3) 12 (4) 18

---

KARVY'S INSTITUTE

**48. सर्व विषम स्थानावरील सोंगटयांच्या वरच्या पृष्टावर सम संख्या असल्यास त्या सम संख्यांची बेरीज, तसेच सर्व सम स्थानावरील सोंगटयांच्या वरच्या पुष्टावर विषम संख्या असल्यास त्या विषम संख्यांची बेरिज यांची तफावत किती असेल ?**

(1) 4 (2) 3 (3) 5 (4) 2

---

**परिच्छेद ७**

१९७५७६ च्या काळात स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणाया अनेक स्वायत्त संघटना स्थापन झाल्या. या सर्व संघटनांनी एकत्रितपणे स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर आंदोलनात्मक काम केले. पोलिस कस्टडीतील ' मथुरा बलात्कार' प्रकरणी खटल्यात पोलिस निर्दोष सुटले व मुलीच्या चारिज्याची कोर्टात चिरफाड झाली. त्यावरून संपूर्ण देशात स्त्रियांवरील हिंसाचाराच्या आणि बलात्काराच्या विरोधात वादळी मोहीम सुरू झाली. त्यातून उभ्या राहिलेल्या 'बलात्कारविरोधी मंचा'चा इतर अनेक स्त्रीसंघटनांबरोबर स्त्रीमुक्ती संघटना एक महत्वाचा घटक होता. या मोहिमेच्या निमित्ताने बलात्काराविषयी अनेक मुद्दे स्त्री चळवळीने पुढे आणले व लावून धरले. स्त्रीचळवळीच्या दबावामुळे सरकारला बलात्काराविषयीच्या कायद्यात बदल करावा लागला. गुप्त चौकशी, स्त्रीच्या पूर्वचारि याची चर्चा, बलात्कार केला नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी पुरूषांवर, असे अनेक सकारात्मक बदल कायद्यामध्ये झाले.

याच काळात स्त्रियांवरील हिंसाचारासंबंधी समाजात मोठया प्रमाणात जागृती झाली आणि स्त्रियाही हिंसाचाराला विरोध करण्यासाठी तयार होऊ लागल्या. पुण्यामध्ये मंजुश्री सारडाच्या संशयास्पद मृत्यूच्या निमित्ताने पुन्हा एकदा समाज ढवळून निघाला. सर्व स्त्रीसंघटनांनी त्याविरूध्द आवाज उठवण्यास सुरूवात केली. या निमित्ताने कुटुंबांतर्गत हिंसेविरूध्द मोहीम सुरू झाली. हुंडयाचा विषयही ऐरणीवर आला. त्याचा परिणाम समाजमनावर तर झालाच; पण हुंडयाच्या कायद्यातही बदल झाला. या मोहिमेतही संघटनेने हिरिरीने भाग घेतला.

मथुरा केसच्या निमित्ताने स्त्रीवरील कोणत्याही प्रकारच्या अत्याचाराविरूध्द सर्व स्त्रीसंघटनांचे एक व्यासपीठ तयार झाले. अत्याचाराच्या अनेक घटनांमध्ये या व्यासपीठातर्फे मोर्चे, आंदोलने, मोहिमा चालविल्या गेल्या.
त्याचा समाजमानस बदलण्याच्या दृष्टीने चांगला फायदा झाला.

महाराष्ट्रात निरनिराळया निमित्ताने स्त्रीसंघटना एकत्र येऊन काम करत असताना राज्यपातळीवर सर्व संघटनांचे एक कायमस्वरूपी व्यासपीठ असावे म्हणून पुण्याला ' संपर्क समिती'ची स्थापना करण्यात आली. तिचा 'स्त्रीमुक्ती संघटना' एक महत्वाचा घटक होता. आंतरराष्ट्रीय महिलादिनाचे राज्यव्यापी कार्यक्रम या समितीतर्फे घेतले जात. त्यामुळे सबंध महाराष्ट्रातील स्त्री संघटनांच्या कामकाजामध्ये सुसूत्रता आली आणि सर्व संघटनांचे एक सशक्त जाळे तयार झाले.

KARVY'S INSTITUTE

**49. खालील विधाने लक्षात घ्या.**

(a) स्त्रीहिंसा हे स्त्री चळवळी निर्माण होण्याचे मुख्य कारण होय.

(b) स्त्री हिंसा घडल्यावर सामान्यत: स्त्री चळवळीना स्पूरण येत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही विधाने अचुक आहेत

(2) दोन्ही विधाने चुक आहेत

(3) विधान a अचुक आहे परंतु विधान b चुक आहे.

(4) विधान a चुक आहे परंतु विधान b अचुक आहे.

---

**50. खालील कोणती विधाने अचुक आहेत ?**

(a) स्त्री आंदोलनामुळे देशातील स्त्री हिंसा गुन्हेगारी कमी झाली.

(b) स्त्री अत्याचार विरोधातील आंदोलने यांमध्ये सातत्याने विरोधाभास राहीला आहे.

(c) स्त्री हिंसा विरोधी संघटना भारतात सर्वत्र विखूरलेल्या आहेत.

(1) केवळ b (2) केवळ a व c (3) केवळ a (4) केवळ c

---

**51. स्त्री हिंसा विरोधी संघटनांच्या आंदोलनाने खालीलपैकी कोणता परीणाम घडून आलेला दिसतो.**

(a) स्त्री संरक्षणाच्या बाबींवर शासनाची सकारात्मक भूमिका निर्माण झाली.

(b) स्त्री हिंसेच्या आंदोलनामधील सामाजिक बांधीलकी निर्माण होत आहे.

(c) स्त्री संघटनांमध्ये सुसुत्रता येऊन त्यांचे सशक्तीकरण झाले.

(1) केवळ a व b (2) केवळ c (3) केवळ a व c (4) केवळ b

---

**52. वरील परिच्छेदावरून कोणता निष्कर्ष काढता येईल ?**

(1) स्त्री हिंसा संघटन निर्माण करते.

(2) स्त्री संघटनात्मक कार्य प्रतिक्रीयात्मक असते.

(3) स्त्री अत्याचार बहुआयामी आहे.

(4) स्त्री हिंसा सामाजिक विषमतेचे प्रतिक आहे.

---

KARVY'S INSTITUTE

**परिच्छेद ८**

एखादा बहुरूपी जसा वेगवेगळया रूपात आढळतो, तसं कार्बन हे मूलद्रव्य वेगवेगळया रूपात आढळतं. कार्बन म्हणजे जणू रसायनाशास्त्रातला बहुरूपीच ! कार्बनची ही बहुरूपंसुद्धा वैशिष्टयपूर्ण आणि आश्चर्यकारक गुणधर्म असलेली आहेत. यापैकीच एक आहे ग्राफिन. बांधकामासाठी वापरण्यात येणाया पोलादापेक्षा तीनशेपट अधिक मजबूत आणि हियापेक्षा चाळीसपट कठीण असलेलं ग्राफिन रबरासारखं लवचीत आहे.

मधमाश्यांच्या पोळयाच्या कप्प्यांचा जसा आकार असतो, त्या आकारात कार्बनचे अणू एकमेकांशी जोडले जाऊन ग्राफिनचे रेणू तयार होतात. या ग्राफिनला लांबी आणि रूंदी आहे, पण जाडी नाही. ग्राफिनचे सुमारे तीस लाख थर एकमेकांवर ठेवले, तर त्याची जाडी केवळ एक मिलिमीटर होईल.

सामान्य तापमानाला ग्राफिन हे विद्युत प्रवाहाचं चांगलं वाहक आहे. त्यामधून उष्णतेचं चांगल्या प्रकारे वहन होतं.

ग्राफिनचा उपयोग वजनाने अतिशय हलके असलेले उपग्रह, विमानं आणि लष्करी मोटारींच्या बांधणीत करता येतो. 'बोइंग ७८७' या अत्याधुनिक विमानातही ग्राफिनचा वापर केलेला आहे. विमानांचा भूसंपर्क होत नसल्याने आकाशात उडणाया विमानांना लखलखणाया विजांचा धोका सहसा संभवत नाही. पण तरीही ग्राफिनचा समावेश असलेल्या पदार्थांचा सूक्ष्म थर विमानांना अधिकच सुरक्षित बनवतो.

बर्कलेच्या संशोधकांनी नुकताच ग्राफिनपासून तीस नॅनोमीटर इतक्या सूक्ष्म जाडीचा आणि सात मिलिमीटर रूंदीचा एक पातळ पडदा बनविला आहे. हा पडदा सिलिकॉन डायऑक्साईडचा थर दिलेल्या दोन सिलिकॉन इलेक्ट्रोडमध्ये ठेवण्यात आला. या इलेक्ट्रोडला विद्युतपुरवठा केला असता स्थितीक विद्युत बल निर्माण होतं आणि त्यामुळे ग्राफिनचा पातळ पडदा थरथरतो. पडद्याच्या थरथरण्यामुळे विविध प्रकारचे दर्जेदार आवाज तयार होतात. ग्राफिन अत्यंत पातळ पण लवचीक असल्याने आवाजाचा दर्जा अत्युच्च असतो.

ग्राफिन वापरून तयार केलेले मोबाइल हॅंडसेट आता येऊ घातले आहेत. हे हॅंडसेट अत्यंत पातळ आणि लवचीक असल्याने हवे तसे वाकवता येतील किंवा त्यांची चक्क घडी घालता येईल. अशाच प्रकारे घडी घालून कुठेही सहज नेता येणारा टीव्हीसुद्धा भविष्यात तयार होऊ शकेल.

**53. खालीलपैकी अचुक विधाने कोणती ?**

(a) कार्बन मुलद्रव्य विविध रूपे बदलविते

(b) विमांनाना सुध्दा विजेचा धोका होऊ शकतो

(c) सर्व लवचीक वस्तू हलक्या असतात

(1) केवळ a (2) केवळ b व c (3) केवळ b (4) वरील सर्व

---



KARVY'S INSTITUTE

**54. खालीलपैकी कोणता गुण ग्रॅफीनमध्ये नाही?**

(1) अत्यंत कठीण (2) अत्यंत लवचीक

(3) अत्यंत पातळ (4) अत्यंत नाजूक

**55. ग्रॅफीन चा उपयोग कोणत्या तंत्रज्ञानाद्वारे विविध ठीकाणी करता येईल ?**

(1) अतीसुक्ष्म तंत्रज्ञान (Nanotechnology) (2) खगोशास्त्र (Astrophysics)

(3) विद्युत तंत्रज्ञान (Electro Technology) (4) धातूशास्त्र (Metallurgy)

**56. ग्रॅफीनच्या कोणत्या गुणधर्मामुळे त्याच्यापासून तयार होणाया वस्तू हाताळणे अत्यंत सोयीस्कर होतील ?**

(a) अत्यंत कठीण (b) अत्यंत पातळ (c) अत्यंत लवचीक (d) अत्यंत मजबूत

(1) केवळ a व b (2) केवळ b व c (3) a,b,c (4) b,c,d

**परिच्छेद ९**

केंद्र सरकारने नुकतीच देशात १०० स्मार्ट शहरे वसवण्याची घोषणा अर्थसंकल्पातून केली आहे. स्मार्ट शहरे तयार करण्याची ही योजना यशस्वी झाली, असे तेव्हाच म्हणता येईल, जेव्हा भारतासारख्या देशात शहरवाढीच्या संकल्पनेचा नव्याने शोध घेतला जाईल. स्मार्ट विचार करण्यासाठी सरकारला अगोदरच पाश्चिमात्य जगात अस्तित्वात असलेल्या आदर्श शहरांची नक्कल करावी लागेल, त्याशिवाय भारतीय परिस्थितीत सुयोग्य ठरतील, अशा सुलभ वास्तव्यास अनुकूल अशा उपाययोजना कराव्या लागतील, पण यात प्रगतीची किंमत अनेकांना न परवडणारी असेल. यात स्मार्ट शहराची कुठलीही सर्वसंमत अशी व्याख्या नसल्याने त्याचा फायदा घेतला जाई ल. ढोबळमानाने स्मार्ट शहर म्हणजे साधनांची कार्यक्षमता व सेवांची सुधारणा साध्य करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणाया मानवी वस्त्या होत. या तंत्रज्ञानाची आवश्यकता आहेच, पण स्मार्ट तंत्रज्ञान आणण्यापूर्वी आपल्याला त्या तंत्रज्ञानाचा वापर कशा प्रकारे करायचा हे माहीत असले पाहिजे. आपण नवीन शहरे कशी वसवणार आहोत, की जुन्याच नागरी वस्त्यांमध्ये सुधारणा करून पिण्याचे स्वच्छ पाणी देणे, कचयाच्या डोंगरांचे नीट व्यवस्थापन करणे, नद्या नष्ट होण्याच्या अगोदर सांडपाण्यावर प्रक्रिया करणे, शिवाय श्वासावाटे विषे घेतली जाऊ नयेत यासाठी प्रदूषण रोखणाया काही मूलभूत उपाययोजना करणार आहोत हे समजायला मार्ग नाही.

जर आपण आधुनिक अशा भारतीय शहराची काही स्वप्ने उराशी बाळगली असतील तर हे करणे शक्य आहे. आपण गाझियाबाद, मुझफ्फरनगर, राजकोट, सोलापूर, तुमकूर व अगदी गुडगॉवचे शांघाय किंवा सिंगापूर करू शकणार नाही□पण आपण ही शहरे राहण्यास अशा पद्धतीने अनुकूल करू शकतो की, इतर देश त्या प्रारूपाचे अनुकरण करतील. हे कसे शक्य आहे□असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. पाणी, सांडपाणी, कचरा, वाहतूक,

KARVY'S INSTITUTE

हवा प्रदूषण यांचा विचार केला तर सध्या श्रीमंत पाश्चिमात्य शहरांचे प्रारूप हे महागडे आहे, त्यात साधनांचे व्यवस्थापन वगैरे सगळे आहे, पण तशी शहरे सर्वांना परवडणार नाहीत. अगदी ही शहरेसुद्धा तेथील लोकांना सेवा पुरवण्यासाठी प्रत्येक सोयीसुविधांची फेरबांधणी करू शकणार नाहीत. कारण आताची शहरे ही अनेक वर्षांपूर्वी वसवली गेली आहेत. जेव्हा एखाद्या शहराकडे निधी असतो तेव्हा तो गुंतवणुकीमुळे वाढत जातो. जरी आपण हरित शहरे वसवण्याचे ठरवले तरी आपण तेवढयाच पातळीची गुंतवणूक होईल, असे गृहीत धरू शकत नाही. शहरवाढीसाठी एक नवीन दृष्टिकोन अंगीकारावा लागेल.

**57. 'स्मार्ट शहरे' म्हणजे कशी शहरे ?**

(1) भव्य वास्तू आणि विस्तृत प्रदेश असलेली शहरे

(2) संसाधनांची कार्यक्षमता व सेवांची सुधारणा करणारी शहरे

(3) विविध नाविण्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर केलेली तांत्रिक शहरे

(4) निश्चित सांगता येणे शक्य नाही

---

**58. भारतापुढे 'स्मार्ट शहरांबाबत' कोणते आव्हाहन आहे ?**

(1) पाश्चिमात्य शहरांचे महागडे प्रारूप

(2) हरीत शहरांची निर्मिती कार्य

(3) सर्वसमावेशक मूळस्थानीय प्रारूप

(4) कचयाचे योग्य व्यवस्थापन

---

**59. भारतातील बरीच शहरे प्राचिन कालीन किंवा बरीच जूने असल्याने कोणती अडचण मुख्यत्वाने राहू शकते ?**

(1) प्रदुषण नियंत्रण अत्यंत खर्चीक

(2) सोयी सुविधांची पुर्नरचना करणे कठीण

(3) स्मार्ट तंत्रज्ञानकरीता मानसिकतेचा अभाव

(4) साधनांची अकार्यक्षमता

---

**60. खालीलपैकी विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा.**

(a) स्मार्ट शहरांची व्याख्या बहुतांशी पाश्चात्य देशाच्या दृष्टीकोनातून विकसित झाली आहे.

(b) भारतीय शहरांना पाश्चात्यकरणाच्या प्रक्रियेतून स्मार्ट शहरांमध्ये परावर्तीत करणे अशक्य आहे.

(c) भारतीय शहर विकासाच्या निश्चित दृष्टिकोन विकसित झाला नाही आहे.

(1) a व b अचुक आहेत आणि b हे a चे कारण आहे.

(2) a व c अचुक आहेत आणि a हे c चे कारण आहे.

(3) a व b अचुक आहेत, परंतू c चुक आहे.

(4) a व b अचुक आहेत, परंतू b चुक आहे.

---



KARVY'S INSTITUTE

**परिच्छेद १०**

"गांधीवाद, हिंदुत्ववाद आणि साम्यवाद या तीन प्रमुख विचारसरणी आपल्याकडे गेल्या साठसत्तर वर्षांपासून चालत आलेल्या आहेत. या तिन्हीतील अपुरेपणा जाणवत असल्याने सध्या देशात वैचारिक गोंधळाचे, दिशाहीनतेचे वातावरण आहे. चौथी राजीव गांधींच्या रूपाने आलेली तंत्रवादी वृत्तीही हळूहळू फैलावत आहे. या वृत्तीला एकूण विचारसरणींचेच वावडे आहे. यांत्रिक आणि तांत्रिक कुशलतेचा विकास घडून आला की देश सुधारला, पुढे गेला असे या तरूण नेतृत्वाला वाटते आहे. देश उभारणीला काही विधायक मानसिक शक्ती जागृत कराव्या लागतात. यासाठी एखादे तत्वज्ञान, एखादी बळकट श्रद्धा रूजवावी लागत, याचा पत्ताच या नव्या नेतृत्वाला अद्याप लागलेला नाही. त्यामुळे जुनाट धर्मश्रद्धाच पुन्हा डोके वर काढीत आहेत. या श्रद्धांचा आधार घेऊन देशविभाजनाच्या प्रवृत्ती ठिकठिकाणी संघटित होत आहेत. या विभाजन प्रवृत्ती केवळ लष्करी बळावर मोडून काढता येणार नाहीत. त्यासाठी एकात्म राष्ट्रवादाच्या जाणीवा समाजातल्या सर्व थरांत, सर्व वर्गांत, विविध धार्मिक गटांत निर्माण व्हायला हव्यात. एकात्मराष्ट्रभावविरोधी जे अलगतावादी धार्मिक गट असतील, मग ते हिंदूंमधले काही शीख सांप्रदायिक असोत किंवा इतर धर्मांचे असोत, त्यांच्याविरूद्ध स्पष्ट व उघड भूमिका घ्यायला हवी. सर्व धर्मांमधले जे एकात्मराष्ट्रवादी प्रवाह असतील त्यांचा स्वीकार व आदरही केला पाहिजे. साध्या शब्दांत सांगायचे, तर... वरील तिन्ही विचारसरणींचा एक नवा कालोचित संगम घडून यायला हवा... असा काही विचारांचा, प्रवृत्तींचा संगम घडून आला तरच आजच्या कठीण काळावर आपण मात करू शकू. नाहीतर आजचे अराजक, अस्थैर्य, विघटनावाद फैलावतच राहील.

**61. देश निर्मिती आणि विकासासाठी कशाची आवश्यकता आहे ?**

(1) नवनवीन तंत्रज्ञानाचा विकास आणि प्रचार

(2) विविध तत्वज्ञानाची सांगड घालून राष्ट्रवाद जागृतीकरण

(3) लष्करी बळाचा वापर करून अखंडता निर्माण करणे

(4) गांधीवादाच्या मार्गावर आधुनिकतेला वाव देणे.

---

**62. खालीलपैकी कोणती विचारसरणी स्वत:च राष्ट्रबांधणीचा पाया भक्कम करू शकणार नाही ?**

(1) तंत्रवाद (2) गांधीवाद (3) साम्यवाद (4) यापैकी नाही

---

KARVY'S INSTITUTE

**63. पुढील दोन विधानांचा विचार करा.**

(a) कोठलीही विभाजीत प्रवृत्तीची चळवळीला एकात्मराष्ट्रवादयांनी स्पष्ट व उघड भूमिकेने विरोध दर्शविला पाहिजे

(b) जुनाट धर्मश्रध्दा देशविभाजनाची प्रवृत्तीला पाठवल देण्याचे कार्य करते.

**पर्यायी उत्तरे** :

(1) दोन्ही बरोबर (2) दोन्ही चुक

(3) a व b बरोबर असून a हे b वर आधारित आहे

(4) a चुक असून b बरोबर आहे.

---

**64. अराजकता, अस्थिरता आणि विभाजीतवृत्ती पसरण्याची भिती केव्हा असेल ?**

(1) तरूणांमध्ये तांत्रिक कुशलतेतून नेतृत्व निर्माण करता न आल्यास

(2) अंधश्रध्दा निर्मूलन योजना शासनास राबविता न आल्यास

(3) अलगतावादी धार्मिक राष्ट्रभाव केवळ एकाच धर्मात जागृत झाल्यास

(4) सर्व एकात्म राष्ट्रवादी विचारसरणीचा संगम न झाल्यास

---

**परिच्छेद ११**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रात महिला सुरक्षित, अशा जाहिरातींचा रतिब घातला जात असला तरी राज्यात दिवसेंदिवस महिला व बालकांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची मनोधैर्य योजनेच्या अंमलबजावणीतून चिंताजनक माहिती पुढे आली आहे. गेल्या आठनऊ महिन्यांत मनोधैर्य योजनेअंतर्गत जिल्हानिहाय स्थापन करण्यात आलेल्या पुनर्वसन मंडळांकडे महिला व बालकांवरील अत्याचाराच्या १११२ तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यांतील ५१२ प्रकरणांमध्ये पिडीत महिला व बालकांवर अत्याचार झाल्याचे सिद्ध झाले आहे. त्यात महिलांवरील बलात्कारांच्या सुमारे पावणे दोनशे घटनांचा समावेश आहे. महिलांचे मनोधैर्य खच्ची करणाया या घटना आहेत.

संबंध देश हादरवून टाकणाया दिल्लीतील बलात्काराच्या घटनेनंतर केंद्र सरकारला महिलांवरील अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी कडक कायदा करावा लागला. त्यांच्या पुनर्वसनासाठीही योजना जाहीर करण्यात आली. त्याच धर्तीवर राज्यात अत्याचारग्रस्त महिला व बालकांच्या पुनर्वसनासाठी ऑक्टोबर २०१३ पासून मनौधर्य योजना सुरू करण्यात आली. बलात्कार पिडीत महिलेला २ ते ३ लाख रूपयांची मदत, तसेच ॲसिड हल्ल्यात जखमी झालेल्या महिलेला ३ लाख रूपयांपर्यंत मदत देण्याची त्यात तरतूद करण्यात आली आहे.

KARVY'S INSTITUTE

या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकार्यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्वसन मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. त्यात पोलीस उप अधिक्षक किंवा पोलीस उपायुक्त, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सरकारी वकील, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचा समावेश आहे. बलात्काराची तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलीस कारवाईबरोबरच या मंडळाकडील त्या प्रकरणांची तपासणी करून पिडीत महिलेला व बालकाला आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला जातो.

ऑक्टोबर २०१३ ते १६ जून २०१४ पर्यंत मनोधर्य योजनेतर्गत राज्यातील ३५ जिल्ह्यांत ११११२ महिला व बालकांवरील अत्याचारांच्या घटना घडल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यात ठाणे जिल्ह्यांत सर्वाधिक १८९ तक्रारी असून त्यापैकी ७७ प्रकरणांत अत्याचार झाल्याचे सिद्ध झाले आहे. त्या खालोखाल मुंबई शहर व उपनगरात ६२ आणि पुणे जिल्ह्यात ६१ घटनांची नोंद झाली आहे. ५१२ प्रकरणांतील पिडीत महिला व बालकांना आर्थिक मदत मंजूर करण्यात आली असून प्रत्यक्ष २७३ पिडीतांना मदत देण्यात आली आहे. उर्वरित प्रकरणांची छाननी सुरू आहे. महिला व बाल विकास विभागार्फे या योजनेंर्तत पिडित महिला व बालकांच्या पुनर्वसनासाठी २५ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**65. पुढील दोन विधानांचा विचार करा.**

(a) महाराष्ट्रात मनोधैर्य योजना राबवूनही महीला व बालकांवरील अत्याचाराची प्रकरणे वाढली

(b) मनोधैर्य योजनेमुळे महीला व बालकांवरील अत्याचारावरील तक्रारीचे प्रमाण वाढले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही बरोबर असून b हे a चे कारण आहे.

(2) दोन्ही बरोबर आहेत, परंतू b हे a चे कारण नाही.

(3) दोन्ही बरोबर असून a हे b चे कारण आहे.

(4) दोन्ही चुक आहेत.

---

**66. मनोधैर्य योजनेचे घटक कोणते आहेत ?**

(a) गुन्हेगारास शिक्षा ठोठावणे (b) पिडीताला आर्थिक मदत

(c) पिडीताचे पुर्नवसन (d) पोलिस बंदोबस्त वाढविणे

(1) केवळ a (2) केवळ b व c (3) a,b,c (4) वरील सर्व

---

**67. मनोधैर्य योजनेमध्ये खालीलपैकी कोणता प्रशासकीय विभाग सहभागी नसतो ?**

(1) महसूल विभाग (2) पोलिस विभाग

(3) आरोग्य विभाग (4) महिला व बालविकास विभाग

---



KARVY'S INSTITUTE

परिच्छेद १२

In modern federal countries local government is part of the state government and Panchayati Raj Institutions (PRIs) which deal mainly with local affairs, administered by authorities are subordinate to the provincial government. The local authorities which we refer as PRIs may be elected independently of the state authority by qualified residents or they may consist of partly elected and partly, nominated or wholly nominated members. State government and the PRIs both derive its powers from a portion of the same electorate but local authorities are the creatures of the state legislature. They can not do many things without the explicit sanction of the State government. In independent India it was felt in general that democracy can not be realized as a human and political ideal, nor can a stable and competent democratic state be built in practice, unless there is active participation by the citizen in the process of government and the electorate itself is educated in the exercise of political responsibility. All levels of government must be accessible for popular participation.

Before the conquest of India by the British in ancient and medieval periods the system of local self government in the form of Panchayats were more widespread, more real and more successful. The powers and functions of the local bodies varied from time to time and from one to another. Generally, they were concerned with municipal functions, such as the acquisition and disposal of lands, grant of lands, collection of taxes for local purposes and the administration of justice etc. Almost every village in the country had a self-governing body of its own. Like today a vast majority of the people live in villages, and about all the people enjoyed the advantages of local self-government. In that period there was a community feeling. Tradition and custom strengthened this spirit. As a result there were no group rivalries and the administration of the village went on smoothly. Mahatma Gandhi had elaborated these things for the present when he says, 'every village will be a republic or Panchayat having full powers self-sustained and capable of managing its affairs. In this structure composed of innumerable villages there will be ever-widening, never ascending circles, life will not be a pyramid with the apex sustained by the bottom. But it will be an oceanic circle whose center will be the individual

KARVY'S INSTITUTE

always ready to perish for the village, the latter ready to perish for the circle of villages, till at last the whole becomes one life composed of individuals' [34]

**68. Consider the following Statements**

(a) State Government & Panchayat Raj Institution have common source of power.

(b) Originally popular participative process was percolated upto gross root level.

(c) Panchayat Raj is the weak institution in Indian federation.

Which of the above Statements is/are properly derived from given passage ?

(1) Only a (2) Only a & b (3) Only b & c (4) all of above

---

**69. Which of the following must be there for popular participation process in governance?**

(1) Elections at all levels of federal ladder.

(2) Strong political will at central level.

(3) Accessibility of all ladders of Government.

(4) Increasing Standard of education at glass root level.

---

**70. As per Mahatma Gandhi which of the following facture can be helpful to make every village Republic ?**

(1) Fight for truth

(2) Sacrifice

(3) Devolution of power

(4) Encircling village with other villages.

---

**71. Which of the following Sentence can be inferred from the passage ?**

(1) Britishers destroyed the urban area for village destruction.

(2) In ancient & medieval India villages were the centre of high standard of living & equality.

(3) The self government ultimately sustain based on community spirit.

(4) Mahatma Gandhi wants to make India realized self Republic.

---

KARVY'S INSTITUTE

परिच्छेद १३

The move toward faith-based schools in Britain reflects also a particular vision of Britain as 'a federation of communities, rather than as a collectivity of human beings living in Britain, with diverse differences, of which religious and community-based distinctions constitute only one part (along with differences in language, literature, politics, class, gender, location, and other characteristics). It is unfair to children who have not yet had much opportunity of reasoning and choice to be put into rigid boxes guided by one specific criterion of categorization, and to be told: 'That is your identity and this is all you are going to get.'

In the annual lecture for 2001 at the British Academy which I had the privilege of giving (it was called 'Other People') I presented the argument that this 'federational' approach has a great many problems, and in particular tends to reduce the development of human capabilities of British children from immigrant families in a significant way. Since then the incidents of suicide bombing in London (in July 2005), carried out by British-born but deeply alienated young men, have added another dimension to the question of self-perception and its cultivation in Britain. However, I would argue that the basic limitation of the federationist approach goes well beyond any possible connection with terrorism. There is an important need not only to discuss the relevance of our common humanity-a subject on which schools can play (and have often played in the past) a critical role. There is in addition, the important recognition that human identities can take many distinct forms and that people have to use reasoning to decide on how to see themselves, and what significance they should attach to having been born a member of a particular community. I shall have the opportunity to return to this issue in the last two chapters of the book.

The importance of nonsectarian and nonparochial school education that expands, rather than reduces, the reach of reasoning (including critical scrutiny) would be hard to exaggerate. Shake speare gave voice to the concern that 'some are born great, some achieve greatness; and some have greatness thrust upon them.' In the schooling of children, it is necessary to make sure that smallness is not 'thrust upon' the young, whose lives lie ahead of them. Much is at stake here.

KARVY'S INSTITUTE

**72. What is basic Problem of Faith based Schools ?**

(1) Restrict reasoning ability of Students
(2) Make compulsion on Students for religious prayer
(3) Not allowed to grow in natural condition
(4) Learn compulsorily in ancient languages.

---

**73. Consider following Statements ?**

(a) Freedom is antithetical to the parochialism
(b) Children in free environment have great ability to take reasoned decisions.
(c) Religious teacting helpful to developed freedom of thought.

From the above paragraph which of above can be inferred ?

(1) Only a & b (2) Only b & c (3) Only a & c (4) all of above

---

**74. Which of the following word/words can be considered as criticism on faith based school in Britian as per paragraph ?**

(a) Fundamentalist (b) Bias (c) Choice Curtailment (d) reasoned role
(1) Only a & b (2) Only a & d (3) a,b,c (4) a,c,d

---

**75. What author tried to convey the message from paragraph ?**

(1) Faith based School are not suitable in Britain.
(2) School of Britain are similar to school of Pakisthan
(3) Freedom generate knowledge in British Schools.
(4) Freedom is necessary to build reasoning ability to understand others.

---

**सुचना : खालील पाच प्रश्न हे स्पर्धकाची निर्णयक्षमता तपासण्याकरीता आहेत. या प्रश्नामध्ये ऋणात्मक गुण नाहीत.**

**76. शासनाने गरीबी निर्मूलनाकरीता १०० हून अधिक योजना तयार केल्या आहेत. ह्या सर्व योजना भारतातील गरीबी लवकरात लवकर संपुष्टात यावी ह्या उद्देशातूनच निर्माण झाल्या आहेत. यातील बहुतांशी योजना गरीबांना अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या मुलभूत गरजांची पुर्तता करण्याच्या दृष्टीकोनातून निर्माण केल्या आहेत. असे असतांना सुध्दा अजुनही गरीबी दूर झाली नाही आहे.**

**वरील विधानाचा आधारे खालीलपैकी कोणता उत्तम उपाय सुचवाल ?**

(1) आणखी नवीन योजना निर्माण करण्याची गरज आहे.
(2) सर्व योजनांच्या पुर्नरचनाकरणाची आवश्यकता आहे.
(3) गरीबांमध्ये कुंटुंबयोजनेतून लोकसंख्या नियंत्रण करणे गरजेचे आहे.
(4) सर्व योजना फुकटात सवलती देत असल्याने त्या बंद कराव्यात कारण यामुळे गरीबांची क्रयशक्ती संपुष्टात येत आहे.

---

KARVY'S INSTITUTE

**77. तुमचा लहान भाऊ आतंकवादी संघटनेशी संबंध ठेवतो आहे. त्याने त्या संघटनेच्या बयाच विध्वंसक कार्यांना मदत करण्याचे ठरविले आहे. भविष्यात तो कदाचित त्या विध्वसंक कार्यात प्रत्यक्षात सहभागी सुध्दा होऊ शकतो. अशा प्रसंगी आपण काय कराल ?**

**वरील विधानाचा आधारे खालीलपैकी कोणता उत्तम उपाय सुचवाल ?**

(1) त्याचेशी नाते तोडून त्याला घरातून हाकलून लावाल.

(2) त्याला यापासून परावृत्त करण्याचा पुर्ण प्रयत्न कराल.

(3) पोलिंसाना माहीती देऊन अटक कराल जेणेकरून त्याचा कृत्याला आळा घालता येईल.

(4) आतंकवादी संघटनेच्या नेत्याला भेट देऊन तुमच्या भावाला त्याच्या संघटनेतून काढून टाकण्यास सांगाल.

---

**78. समजा तुम्ही एका खाजगी इस्पितळात वार्ड बॉय म्हणून कामाला आहात. हे इस्पितळ तुमच्या शहरातील नामांकीत डॉक्टराचे आहे. तुम्हाला येथे लिंग निराधरण करून स्त्री भृण हत्याच्या प्रकार सर्रास सुरू आहे असे दिसले. तुम्ही काय कराल?**

(1) याची लेखी तक्रार पोलिंसाकडे कराल. (2) लोकांना एकत्रित करून ते इस्पितळ बंद कराल.

(3) ती नोकरी सोडून दयाल. (4) डॉक्टर अत्यंत प्रभावी असल्याने बघ्याची भूमिका घ्याल.

---

**79. शहरीकरणामुळे पर्यावरणीय प्रदुर्षण अत्यंत झपाट्याने वाढत आहे. त्यास सर्वात जास्त भागीदारी ही रहदारीतील अव्यवस्थापन आणि वाहतुकीच्या साधनांचा गैरवापराची आहे. त्यातच वाहतुक विभाग, पर्यावरण विभाग आणि इतर विभागांचा एकमेकांशी सुसंबंध नाही. यामुळे शहरे एक प्रकारे मृत्युचे युध्द क्षेत्रच झालेले आहे. तुम्ही काय मत दयाल ?**

(1) याबाबतचे नियम अधिकाधिक कठोर बनविण्याची गरज आहे.

(2) प्रदुर्षण विरहीत वाहतुकीच्या साधनांचा प्रचार करावा.

(3) व्यक्तींनी खेडेगावाकडे पलायन करावे.

(4) यावर व्यापक आणि सर्वकक्ष यंत्रणा योग्यरीतीने राबवावी.

---

**80. समाजामध्ये सहिष्णुतेची कमतरता सातत्याने जाणवत आहे. एक सुजाण नागरिक म्हणून तुम्ही कोणता उपाय सुचवाल ?**

(1) राजकीय पुढायांनी मोठया प्रमाणात यावर मोठे समारंभ घ्यावेत.

(2) लोकशिक्षणातून वंधुभावना जागृत करावी.

(3) कायदा व सुव्यवस्था अत्यंत तत्पर आणि संवेदनशील करावी.

(4) समाजामधील आर्थिक विषमता दूर करावी.

---

KARVY'S INSTITUTE

**सुचना – (पृष्ठ 1वरून पुढे )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे. असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परिक्षामंध्ये होणाया गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्तीस कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि / किंवा रूपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परिक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. मात्र परिक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.

---

**नमुना प्रश्न**

प्रश्न क्र. 81 सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्र. क्र. 81 समोरील उत्तरक्रमांक "(3)" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प.क्र. 81 (1) (2) ● (4)

अशा पध्दतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.

---

KARVY'S INSTITUTE